MHNG16000352-2019
आर.सी.सी.५७/२०१९
सरकार वि. लक्ष्मण
नि.क्र. १०

**सरकार तर्फे साक्षदार कमांक ०२ याची जबानी**
**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि,**
**नाव** :- दिनेश रेवाराम पडोळे,
**वय** :- ४८ वर्षे **व्यवसाय** :- शेती,
**राहणार :**- गोवरी, ता. मौदा, जि. नागपूर
-------------------------------------

**सरतपास शपथेवर सरकार तर्फे ॲड. श्री.एम.एम. पाटणकर यांचे व्दारा**

दि.११.११.२०१८ रोजी पोलिसांनी मला पंचनामाकामी बोलवले नाही व माझे समक्ष काहीही जप्त केले नाही. मी आमचे गावातील चौकातील भोतमांगे यांचे किराणा दुकानात असतांना पोलिसांनी सांगितल्याने सहया केल्या होत्या आता मला घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामे दाखवले. त्यावर माझय सहया असून त्यातील मजकुर माहित नाही. करीता सदर पंचनाम्यांना सही पुरता अनुक्रमे **नि.क्र.११ ते १४** देण्यात येते.

**साक्षीदार सरकारी पक्षास समर्थन करीत नसल्याने सरकारी वकीलांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवाणगी मागितली करीता परवानगी देण्यात येते.**

मला फिर्यादी व आरोपी यांच्यात घडलेल्या घटनेबाबत व घटनास्थळाबाबत काहीही माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.११.११.२०१८ रोजी पोलिसांनी मला गोवरी ते कोटगाव रोडवर गिटटी पडलेल्या जागेवर बोलावून तेथे माझे समक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला व तो मला वाचून दाखवला व त्यावर मी वाचून समजून सही केली. हे म्हणणे खरे नाही की, तेथे पोलिसांनी माझे समक्ष गिटटीचे साधे तुकडे व रक्त मिश्रीत गिटटीचे तुकडे जप्त केले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबतचा जप्ती पंचनामा माझे समक्ष पोलिसांनी तयार करून तो मला वाचून दाखवला व त्यावर मी समजून सही केली. हे म्हणणे खरे नाही की, तेथे पोलिसांनी माझे समक्ष आरोपीच्या ताब्यातून एक जुना वापरता कथ्थ्या रंगाचा रक्ताचे डाग असलेला पॅट व जुना वापरता फिकट गुलाबी रंगाचा फुल बाहयाचा रक्ताचे डाग

असलेला शर्ट तसेच एक रस्ताचे डाग असलेला गोटा जप्त केला होता व त्याबाबतचा जप्ती पंचनामा माझे समक्ष पोलिसांनी तयार करून तो मला वाचून दाखवला व त्यावर मी समजून सही केली. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझे समक्ष फिर्यादीच्या ताब्यातून एक जुना वापरता काळपट रंगाचा रक्ताचे डाग असलेला पॅट व जुना वापरता फिकट पिवळया रंगाचा फुल बाहयाचा रक्ताचे डाग असलेला शर्ट तसेच भगव्या रंगाचा एक जुना वापरता रक्ताचे डाग असलेला दुपटटा जप्त केला होता व त्याबाबतचा जप्ती पंचनामा माझे समक्ष पोलिसांनी तयार करून तो मला वाचून दाखवला व त्यावर मी समजून सही केली. मी पंचनाम्यावर सही केली तेव्हा शकील छवारे तेथे होता किंवा नाही माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीस ओळखत असल्याने त्याला वाचवण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास आरोपी तर्फे श्री. ए.एस. रेवतकर यांचे व्दारे.**

नाकारले.

श्रवणोत्तर स्विकृत

समक्ष

Digitally signed by Santosh Pundlikrao Wankhade
Location: Mouda
Date: 2020.03.09 11:41:12 +0530

दिनांक: ०७/०३/२०२०

(एस.पी.वानखडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
मौदा.